# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः 08.12.2024** **वारः रविवार**

---

•राज्यात विशेष अधिवेशनाद्वारे विधानसभा सदस्यांच्या शपथविधीला सुरुवात

•2025 पर्यंत देशाला क्षयरोगमुक्त करण्यासाठी क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम मैलाचा दगड ठरेल – जे पी नड्डा यांचं प्रतिपादन

•विद्युत वाहन उद्योग क्षेत्रामध्ये 2030 पर्यंत सुमारे 4 कोटी रोजगार निर्मितीची अपेक्षा

•जुन्नरमधील बिबट्या-मानव संघर्षावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

आणि

•ऑस्ट्रेलिया विरुद्ध दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात भारतीय संघ पराभवाच्या छायेत

**विधानसभा**

राज्यात विधानसभेच्या विशेष अधिवेशनाला काल सकाळी मुंबईत प्रारंभ झाला. वंदे मातरम आणि महाराष्ट्रगीतानं अधिवेशनाची सुरुवात करण्यात आली. हंगामी अध्यक्ष कालिदास कोळंबकर यांनी कामकाजाचं संचालन केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी विधानसभेचे सदस्य म्हणून शपथ घेतली. काल 173 नवनिर्वाचित आमदारांनी सदस्यत्वाची शपथ घेतली असून उर्वरित आमदारांचा शपथविधी आज होणं अपेक्षित आहे. विधानसभा अध्यक्षपदाची निवडणूक ९ डिसेंबरला होणार असून त्यानंतर राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित करतील.

दरम्यान, विरोधी पक्षांच्या आमदारांनी इलेक्ट्रॉनिक मतदानयंत्राविषयी शंका व्यक्त करत सदस्यत्वाची शपथ घेण्यास नकार दिला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावरून विरोधकांवर टीका केली.

**नड्डा**

क्षयरोगमुक्त भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणतीही कसर सोडली जाणार नाही, असं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांनी काल सांगितलं. पंचकुला इथून 100 दिवसांच्या देशव्यापी क्षयरोग निर्मूलन मोहिमेचा शुभारंभ त्यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी एका कार्यक्रमाला संबोधित करताना नड्डा म्हणाले की 2025 पर्यंत देशाला क्षयरोगमुक्त करण्यासाठी क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम मैलाचा दगड ठरेल तसंच आता क्षयरोगाचा विळखा तोडण्यासाठी धोरणबदलासह सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. क्षयरोगाच्या रुग्णांना आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ मिळत असून त्यांना महिन्याला 1000 रुपये दिले जात असल्याचही त्यांनी सांगितलं. यावेळी हरियाणाचे मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर आणि आरोग्य मंत्री कुमारी आरती सिंह राव उपस्थित होते. 33 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातील 347 जिल्ह्यांमध्ये ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये क्षयरोगाची प्रकरणं शोधणे, उपचारांमध्ये होणारा विलंब कमी करणे आणि विशेषत: उच्च जोखीम असलेल्या गटांमध्ये उपचाराचे परिणाम सुधारणे यावर भर दिला जाईल. नाशिक जिल्ह्यामध्ये विशेष मोहिमेचा शुभारंभ नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते करण्यात आला. रायगड जिल्ह्यात पनवेल इथं जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी एमजीएम रूग्णालयात या मोहिमेचा आरंभ केला.

**गडकरी**

भारतातील विद्युत वाहन उद्योग क्षेत्रामध्ये 2030 पर्यंत सुमारे 4 कोटी रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा आहे, असं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी काल सांगितलं. नागपूरमधील केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज अर्थात NFSC इथं 'विद्युत वाहनांमधील आगविषयक अपघातांचे व्यवस्थापन' या विषयावर आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. जगातील लिथियमच्या साठ्यापैकी सुमारे 6 टक्के साठा जम्मूमध्ये असून लिथियम आयन बॅटरीच्या रूपात 60 कोटी इलेक्ट्रिक वाहनांमध्ये त्याचा वापर केला जाईल आणि लिथियम आयन बॅटरीच्या किमतीतही घट होईल अशी माहिती गडकरींनी दिली. विद्युत वाहन क्षेत्रात 400 हून अधिक स्टार्टअप्स तयार झाले असून 2025 पर्यंत बाजारात हायब्रीड आणि विद्युत वाहनांचा वाटा 8 टक्क्यांहून अधिक असेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**ध्वजदिन**

देशाच्या सीमेवर सैन्यदलाच्या जवानांच्या जागत्या पहाऱ्यामुळं देशातील नागरिक सुखानं राहू शकतात आणि देश प्रगती करू शकतो. ही जाणीव ठेवून प्रत्येकानं सशस्त्र सैन्यदल ध्वजनिधीला आपलं योगदान दिलं पाहिजे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं आहे. गेल्या वर्षभरात

ध्वज निधी संकलनाच्या कार्यात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल विविध शासकीय आणि निमशासकीय संस्थांच्या प्रमुखांचा सशस्त्र सेना ध्वज दिनाच्या अमृतमहोत्सवी दिनानिमित्त काल राजभवनात सत्कार करताना ते बोलत होते. सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनात सन 2023 या वर्षात कोल्हापूर जिल्ह्यानं 2 कोटी रुपये म्हणजे उद्दिष्टाच्या 124 टक्के संकलन करुन राज्यात तिसरा क्रमांक मिळविल्याबद्दल जिल्ह्याचा गौरव करण्यात आला. प्रभारी जिल्हाधिकारी संजय शिंदे आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल (निवृत्त) भीमसेन चवदार यांनी हा सन्मान स्वीकारला. हौतात्म्य प्राप्त झालेल्या वीर जवानांच्या कुटुंबियांच्या कल्याणासाठी, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी तसेच सेवानिवृत्त जवानांच्या पुनर्वसनासाठी ध्वजनिधीचा विनियोग केला जातो.

**<u>वॉका-बिबटे</u>**

इंट्रो

पुणे जिल्ह्यातील बिबट्याचं प्राबल्य असलेल्या भागात मानवासोबत संघर्ष रोखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. त्यात आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला जात आहे. बिबट्याची हालचाल दिसल्यावर सायरन वाजवण्याची यंत्रणा पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात कार्यान्वित करण्यात आली आहे. त्याचा हा वृत्तांत...

स्क्रीप्ट

**जुन्नर वनविभागातील आंबेगाव, जुन्नर, शिरूर आणि खेड या चार तालुक्यांमध्ये सुमारे 500 बिबट्या असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात काम करताना किंवा मुलांना घराबाहेर सोडताना सुरक्षिततेचे गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. पकडलेल्या बिबट्यांना जंगलात सोडल्यावर ते पुन्हा परत येण्याची शक्यता असते. बिबट्याच्या आश्रयस्थानांची संख्या कमी होत आहे. निवारा, अन्न आणि पाण्याची कमतरता भासत आहे. त्यामुळं बिबट्या भक्ष्य पकडण्यासाठी शेतकऱ्यांच्या दारापर्यंतत जाऊ लागला आहे. यावर उपाय म्हणून आता कृत्रिम बुद्धिमत्तेची मदत घेऊन जुन्नर वनविभागात दोन यंत्रणांचा वापर करण्यात येत आहे. मोशन सेन्सर ॲनालायझरसह बिबट्या शोधण्याच्या सॉफ्टवेअरचा वापर बिबट्या आणि मानवांमधील संघर्ष कमी करण्यासाठी उपयुक्त असल्याचं दिसून येत आहे. बिबट्या दिसताच, मोशन सेन्सर त्याची हालचाल ओळखतो आणि सायरन वाजवतो. त्या  आवाजानं बिबट्या पळून जातो. एआय लेपर्ड डिटेक्शन सॉफ्टवेअरमध्ये बिबट्याची पाच हजारांहून अधिक छायाचित्रं जतन करण्यात आली आहेत. त्यामुळे बिबट्या कॅमेरासमोर आल्यावरच सायरन वाजतो. बिबट्यांचे वास्तव्य असलेल्या पंचावन्न ठिकाणी ही सॉफ्टवेअर यंत्रणा बसवण्यात आली आहे. जुन्नरमध्ये बिबट्या आणि मानवाच्या सहजीवनातून राज्यातील अन्य ठिकाणी वन्य प्राणी आणि मानव यांच्यातील संघर्षांवर उत्तरे मिळू शकतील. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, मनोज क्षीरसागर, पुणे.**

**<u>बिबटे</u>**

बुलढाणा जिल्ह्यात वन्य प्राण्याचा वावर वाढला असून बिबट्यांच्या हल्ल्यात जनावरं ठार झाल्याच्या घटना घडत आहेत. जिल्ह्यातील लोणार इथल्या परिसरात बिबट्यानं शेतातील गाईसह ४ जनावरांची शिकार केल्यानंतर वन विभागानं याचा बंदोबस्त तातडीनं करावा अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

**<u>परदेशी</u>**

मुख्यमंत्र्यांच्या मुख्य सचिव पदावर श्रीकर परदेशी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परदेशी 2001च्या तुकडीतले भारतीय प्रशासकीय सेवेतले अधिकारी असून प्रतिनियुक्तीवर पंतप्रधान कार्यालयात काम करण्याचाही त्यांना अनुभव आहे.

**<u>बालरंगभूमी</u>**

बालरंगभूमी परिषदेचं 'बालरंगभूमी संमेलन' पुण्यात बिबवेवाडी इथल्या अण्णाभाऊ साठे स्मारकात २०,२१ आणि २२ डिसेंबरला आयोजित करण्यात येणार आहे, अशी घोषणा बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष निलम शिर्के-सामंत यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत केली. बालरंगभूमी संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांचं नाव निश्चित झालं असून, संमेलनाचं उद्घाटन ज्येष्ठ अभिनेते डॉक्टर मोहन आगाशे यांच्या हस्ते होणार आहे. नाट्य आणि बालनाट्य क्षेत्रातले मान्यवर यावेळी उपस्थित असतील. समारोप सोहोळ्यात बालरंगभूमी परिषद पुरस्कार ज्येष्ठ नाट्यकर्मी प्रतिभा मतकरी यांना देण्यात येणार आहे.

**<u>युवा</u>**

परभणी इथं विभागस्तरीय युवा महोत्सवाचं उद्घाटन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते झाले. महोत्सवाला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यामध्ये सांस्कृतिक स्पर्धा अंतर्गत समूह लोकनृत्य आणि लोकगीत, चित्रकला, वक्तृत्व कौशल्य विकास स्पर्धा, कविता वाचन, कथालेखन, तर संकल्पना आधारित स्पर्धेमध्ये विज्ञान आणि तंत्रज्ञान यामधील नव संकल्पना इत्यादी प्रकारातील स्पर्धा घेण्यात आल्या. बारा डिसेंबरला नांदेड इथं राज्य युवा महोत्सवात सर्व युवा कलाकार सहभागी होणार आहेत.

**<u>कार्यशाळा</u>**

दिव्यांग मुलगी आणि मुलगा यांच्याकडं पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्याची अद्याप गरज असल्याचं मत अहिल्यानंगर इथं प्रमुख जिल्हा आणि सत्र न्यायाधीश अंजू शेंडे यांनी व्यक्त केलं. जिल्हा न्यायालयातील न्यायिक अधिकारी, विधिज्ञ आणि कर्मचारी यांच्यासाठी लिंगभाव, दिव्यांगत्व, जात आणि इतर प्रकारच्या उपेक्षितांच्या समस्यांवर कायदेविषयक जागरूकता कार्यशाळेत त्या बोलत होत्या.

**क्रिकेट-**

बॉर्डर-गावस्कर करंडक क्रिकेट स्पर्धेतील भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियानं आपलं वर्चस्व कायम राखलं. काल दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारतानं ५ गडी गमावून १२८ धावा केल्या होत्या. यजमान संघाच्या पहिल्या डावातील धावसंख्येपेक्षा भारत अद्यापही २९ धावांनी पिछाडीवर आहे. गुलाबी चेंडूनं खेळल्या जात असलेल्या या कसोटीच्या दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ऋषभ पंत 28 तर नितीश रेड्डी 15 धावांवर खेळत होते. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियानं 1 बाद 86 धावांवर दिवसाची सुरुवात करताना पहिल्या डावात ३३७ धावा करत १५७ धावांची आघाडी घेतली. ट्रॅव्हिस हेडनं १४१ चेंडूत १४० धावा केल्या. मोहम्मद सिराज आणि जसप्रीत बुमराहनं प्रत्येकी चार बळी घेतले. भारताचा पहिला डाव केवळ १८० धावांत आटोपला होता.

**राज्य-**

महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने ५३वी आंतर जिल्हा आणि ८६ वी राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात पार पडली.

स्पर्धेत पुरुष गटात मुंबईचा चिन्मय सोमय्यानं तर महिलांमध्ये सेनहोरा डिसूझा यांनी राज्य अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेत प्रथमच विजेतेपद पटकावलं. नाशिकच्या तनीषा कोटेचानं मुलींच्या १९ वर्षाखालील गटात सलग चौथ्यांदा विजेतेपद पटकावलं तर मुलांमध्ये नाशिकच्याच कुशल चोपडानं विजेतेपदाची हॅट्ट्रिक साधली.

हवामान

विदर्भात आज तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. अन्यत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.